Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

# दैंनदिन ग्रंथालयीन कामकाजात इंटरनेटची (आंतरजाल) उपयोगीता

**जयदिप सुरेश बोरसे**, सहायक ग्रंथपाल, कृषी महाविद्यालय, मुक्ताईनगर

**सारांश**

आजचा काळ माहिती आणि तंत्रज्ञानाचा आहे, आणि या बदलत्या युगात ग्रंथालयांचे स्वरूपही पारंपारिक चौकटीतून बाहेर आले आहे. दैनंदिन ग्रंथालयीन कामकाज अधिक कार्यक्षम आणि गतिमान करण्यासाठी इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणवर होत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयांची भूमिकाही झपाट्याने बदलत आहे. पारंपरिक ग्रंथालयीन सेवांबरोबरच आता डिजिटल सेवा अत्यावश्यक झाल्या आहेत. यामध्ये इंटरनेटचा वापर महत्त्वपूर्ण ठरतो. इंटरनेटमुळे ग्रंथालयातील दैनंदिन कामकाज अधिक गतिमान, परिणामकारक आणि सोयीस्कर झाले आहे. ग्रंथालय व्यवस्थापनासाठी इंटरनेटचा वापर केल्याने ग्रंथसंचयन, वर्गीकरण, निर्गम व परतवणूक प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे. ऑनलाईन कॅटलॉग (OPAC) प्रणालीमुळे वापरकर्ते घरबसल्या पुस्तकांची माहिती शोधू शकतात. यामुळे वेळ व श्रमाची बचत होते. वाचनालये आता ई-पुस्तके, ई-जर्नल्स, संशोधन निबंध, डेटाबेस इत्यादींच्या माध्यमातून वाचकांना अधिक माहितीपुरवठा करू शकतात. शैक्षणिक व संशोधन कार्यात इंटरनेटवरील माहिती उपयुक्त ठरते. इंटरनेटद्वारे ग्रंथालये आंतरराष्ट्रीय नेटवर्कशी जोडली जातात. विविध ग्रंथालयांतील माहिती, दस्तऐवज, साहित्य यांचा विनिमय शक्य होतो. हे संशोधक व अभ्यासकांसाठी फार मोलाचे आहे. ग्रंथपालांसाठीही प्रशिक्षण, वेबिनार्स, नवीन साहित्याची माहिती, जागतिक ग्रंथालयीन चळवळी इ. बाबतीत इंटरनेट मार्गदर्शक ठरते. यामुळे त्यांची व्यावसायिक कौशल्ये अधिक विकसित होतात. एकूणच, इंटरनेटचा समावेश केल्यामुळे ग्रंथालये केवळ पुस्तकांच्या संग्रहालयापुरती मर्यादित न राहता, माहिती केंद्रे बनली आहेत. दैनंदिन कामकाजात इंटरनेटचा वापर हे ग्रंथालयीन व्यवस्थापनाचे भविष्यातील अपरिहार्य अंग आहे.

**मुख्य संबोध:** वेबसाईटस, ब्लॉग्स, डिजिटल लायब्ररी, वाचन संस्कृतीचा प्रसार, इंटरनेट, ग्रंथालय, संगणक, ई-मेल, विश्वकोश इत्यादी.

## प्रस्तावना

वर्तमान युग हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. या डिजिटल युगात ज्ञान व माहितीचा साठा झपाट्याने वाढत असून, त्याचा प्रसार देखील तितक्याच वेगाने होत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रंथालयांचे स्वरूप आणि कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल घडून आला आहे. पारंपरिक ग्रंथालये ही केवळ पुस्तके आणि मुद्रित साहित्याच्या पुरवठ्यावर आधारित होती, परंतु आजच्या घडीला इंटरनेटच्या (आंतरजालाच्या) साह्याने ग्रंथालयीन सेवा अधिक व्यापक, जलद, आणि प्रभावी बनली आहे.

दैनंदिन ग्रंथालयीन कामकाजामध्ये इंटरनेटचा उपयोग विविध स्तरांवर होत आहे. ग्रंथसंग्रह व्यवस्थापन, ग्रंथ शोध प्रणाली (OPAC), वाचनालयीन सदस्यांची माहिती नोंदणी, ऑनलाईन डेटाबेस व ई-पुस्तके उपलब्ध करून देणे, वाचकांच्या शंका समाधानासाठी ई-मेल व चॅटसेवा देणे, तसेच संशोधनासाठी आवश्यक असलेल्या जागतिक माहिती स्रोतांशी थेट संपर्क साधणे यासाठी इंटरनेटचा मोलाचा उपयोग केला जातो. यामुळे ग्रंथालय केवळ पुस्तके ठेवणारी संस्था न राहता, माहितीचे केंद्रबिंदू बनले आहे.

आजच्या स्पर्धात्मक आणि गतिमान जगात ग्रंथालयांना वाचकांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी अधिक लवचिक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम असणे गरजेचे आहे. त्यामुळेच दैनंदिन ग्रंथालयीन कामकाजात इंटरनेटचा वापर अपरिहार्य झाला आहे. इंटरनेटच्या सहाय्याने माहितीचा शोध घेणे, पुस्तकांची उपलब्धता तपासणे, शैक्षणिक व संशोधन साधनांचा वापर करणे यासारख्या अनेक सुविधा एका क्लिकवर उपलब्ध झाल्या आहेत. या प्रस्तावनेतून स्पष्ट होते की, इंटरनेटचा वापर केवळ ग्रंथालयीन सेवांचे आधुनिकीकरण करतोच, पण वाचनसंस्कृतीच्या वृद्धीत



Copyright © | JET Network, All Rights Reserved

देखील महत्त्वाची भूमिका बजावतो. पुढील भागात आपण दैनंदिन ग्रंथालयीन कामकाजातील इंटरनेटच्या विविध उपयोगी पैलूंचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

**विषय प्रवेश**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटचा दैंनदिन ग्रंथालयीन कामकाजात उपयोग अधिक प्रभावीपणे करून जलद सुविधा पुरविण्यात अग्रेसर ठरले आहे. इंटरनेट हे संगणकांच्या जगभर पसरलेल्या कित्येक लाख अशा नेटवर्क्सचे मिळून बनलेले एक प्रचंड नेटवर्क आहे. अनेक वर्तमानपत्रे आणि मासिकात इंटरनेटसाठी आंतरजाल शब्द वापरलेला दिसून येतो. ग्रंथालयीन कामकाम करतांना अनेकदा इंटरनेटचा वापर उपयोगी ठरतो. कल्पना आणि माहितीच्या देवाण-घेवाणीच्या क्षेत्रात इंटरनेटमुळे जगभर क्रांती घडून आली आहे.

**दैंनदिन ग्रंथालयीन कामकाजात इंटरनेटचा (आंतरजाल) उपयोग**

इंटरनेटचा दैंनदिन ग्रंथालयीन कामकाजात मोठया प्रमाणावर उपयोगी पडणाज्या सुविधांचा उपयोग खालील प्रमाणे सांगता येतील.

| विभाग | सेवा / साधने |
|---|---|
| **शोध साधने** | -वेबसाईट्स<br>-विश्वकोष<br>- सी.डी. व मायक्रोचिप्स<br>- विविध सॉप्टवेअर्स |
| **संवाद साधने** | -ई-मेल<br>-चॅंटिंग व मिटिंग<br>- व्हिडीओ कॉन्फरन्सिंग |
| **शिक्षण व माहिती साधने** | -ब्लॉग्स<br>-डिजिटल लायब्ररी<br>- व्हर्चुअल लर्निंग |

**1) वेबसाईट्स:**

शैक्षणिक संशोधनासाठी समस्या शोधणे, संबंधित संशोधनाचा आढावा घेणे, आकडेवारी शोधणे, तसेच संशोधन विषयाशी संबंधीत जगातील कोणत्याही कोपज्यातील माहिती वेबसाईट द्वारे प्राप्त करता येते. संगणकावर बसून वेबसाईट ओपन केल्यावर संशोधन विषयाचा घटक टाकल्यास लगेच भराभर माहिती आपणास मिळू शकते. उदा. आदिवासिंच्या शिक्षणाविषयी माहिती मिळवितांना त्यांची एकुण साक्षरता, एकुण लोकसंख्या, निरक्षरता, स्त्री, साक्षरता राज्यानुसार व जिल्हयानुसार आदिवासी लोकसंख्या व साक्षरता इ. ची माहिती मिळवायची असेल तर पुढील वेबसाईटसवर पाहता येऊ शकते.

www.trti.mah.nic.in, www.tribl.nic.in, www.wikipedia.org.in

अशा प्रकारे शिक्षणाच्या कोणत्याही स्तराची प्रचंड माहिती विविध वेबसाईटसवर मिळविता येते. यात सामान्यपणे पुढील वेबसाईट वापरल्या जातात.

www.yahoo.com, www.google.com, www.rediffmail.com

2) **ई - मेल :**

शैक्षणिक संशोधन करीत असतांना विविध तज्ञ संशोधकांचे मार्गदर्शन घेण्यासाठी तसेच संबंधित व्यक्तींना माहिती पाठविणे माहिती मागविणे इ. साठी फोन किंवा पत्रव्यवहारापेक्षा उत्तम व जलद काम करणारे साधन



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

म्हणजे ई-मेल होय. यामध्ये चित्रे, फोटो, व इतर कोणत्याही प्रकारची माहिती त्वरीत मागविता येते. अर्थात ई-मेल हे इंटरनेटद्वारे संगणकाच्या माध्यमाने पत्रव्यवहाराचे जलद साधन आहे. यामुळे तज्ञ संशोधक, मार्गदर्शक अथवा इतर संबंधीत संस्था कितीही दूर असल्या अथवा परदेशात असल्यातरी ई-मेल द्वारे माहिती मागवून संशोधनाचे कार्य न थांबता करता येऊ शकते.

3) **विश्वकोष :**

शैक्षणिक संशोधनाशी संबंधित विविध संकल्पना स्पष्ट होण्या बरोबर विविध प्रकारची संदर्भ माहिती संगणकातील विश्वकोषांच्या माध्यमाने मिळविता येते. इंटरनेटवर संशोधनाशी संबंधित विश्वकोष व शब्दकोष असतात त्यांच्या आधारे संशोधन कार्य अधिक सोपे करता येते. यात Wikipedia, Britanica, Encyclopedia, इ. विविध कोष उडवून प्रचंड माहिती मिळविता येते.

4) **सी.डी.व मायक्रोचिप्स :**

संशोधनासाठी वेळोवळी लागणारी माहिती ज्याही ठिकाणाहून प्राप्त होते. तेथून ती सी.डी. अथवा मायक्रोचिप्स मध्ये साठवून आपल्या संगणकावर टाकता येते. यामुळे संशोधन माहितीसाठी संगणक कोठेही घेवून जाण्याची गरज पडत नाही. वरील साधनात ती साठवून ठेवून संगणकात टाकता येते. अर्थातच संगणकाच्या तांत्रिक क्षमतेमुळे माहिती सी.डी. व मायक्रोचिप्समधून संगणकात साठवून सुरक्षित ठेवता येत असते. उदा.- साक्षरते विषयी आकडेवारी एखादया कार्यालयात मिळाल्यास तेथील संगणकातून सी.डी.तून ती माहिती आपल्या संगणकात टाकता येते. यामुळे संशोधनाचे कार्य अधिक सोपे व सुलभ होते.

5) **चँटिंग व मिटींग :**

संगणकावर बसून संशोधन विषयास बाबतीत संशोधनाशी संबंधित काम करणाज्या व्यक्तींशी तसेच माहिती मिळविण्यासाठी इतरही मित्रांशी च्ॉटींग करुन संवाद साधता येतो. या मध्ये संगणकावर प्रश्न विचारणे (टाईप करणे) व प्रश्न आल्यावर उत्तर देणे अशी प्रक्रिया सतत सुरु ठेवावी लागत असते. यामुळे ही संशोधनाशी संबंधीत बरीच माहिती मिळविता येते.

6) **विविध सॉप्टवेअर्स :**

संगणकामध्ये असलेल्या विविध सॉप्टवेअरचाही मोठया प्रमाणावर संशोधनासाठी उपयोग होतो. उदा. एम.एस.पेंट या सॉप्टवेअर्स मध्ये विविध आकृत्या काढता येतात, एम.एस.वर्ड या सॉप्टवेअर मध्ये अहवाल लेखन, कोष्टके, पत्रव्यवहार इ. काम करता येते, एम.एस.एक्सल व सॉप्टवेअसमध्ये संख्याशास्त्रीय व गणितीय प्रक्रिया, तक्ते, आलेख, चाटर्स, कोष्टके, याद्या, संख्यात्मक नोंदी इ. करता येतात. तसेच पॉवर पॉईंट मध्ये अहवाल सादरीकरणासाठी स्लाईड निर्मीती व स्लाईड शो इ. यामुळे संशोधनाचे कार्य दर्जेदार होण्याबरोबर आकर्षक व प्रभावी करता येते.

7) **व्हिडीओ कॉन्फरंसिंग :**

व्हिडीओ कॉन्फरंसिंग द्वारे विविध संशोधक व तज्ञांशी थेट भेट घेता येते. आज हे अशक्य वाटत असले तरी भविष्यात संशोधनाची गुणात्मकता वाढविण्यासाठी जगातील विविध संशोधकांशी चर्चा करणे, मार्गदर्शन घेणे, मुलाखती घेणे इ. व्हिडीओ कॉन्फरंसिंग द्वारे केले जाईल. या मध्ये संगणकच प्रमुख माध्यम असतात.

8) **ब्लॉग्स :**

इंटरनेवर विविध तज्ञांचे व संशोधकाचे ब्लॉग्स असतात. हे ब्लॉग्स व्यक्तिगत असले तरी ओपन करता येतात. यात व्यक्ती आपले कार्य, प्रगती, नवीन घटना, स्वता:चे अनुभव, स्वता:चे सर्जनशील विचार इ. मांडत असतात. या ब्लॉग्सच्या माध्यमानेही आपल्याला संशोधनाशी संबंधित विविध माहिती मिळविता येवु शकते. आपणही आपला ब्लॉग्स ओपन करुन त्याला आपल्या संशोधन कार्याची माहिती टाकू शकते.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

9) **डिजीटल लायब्ररी :**

संगणकातील इंटरनेटवरील डिजीटल लायब्ररी मध्ये संदर्भ ग्रंथाची माहिती, विविध लेख, मासिके व वर्तमानपत्रे, नियतकालिके, बातम्य त्याचबरोबर विविध फोटो व फिल्मस असतात. यातुन आपल्या संशोधनाशी संबंधित माहिती शोधुन ती आपण प्रिंट करु शकतो.

10) **व्हर्चुअल लर्निंग :**

व्हर्चुअल लर्निंगच्या माध्यमाने संशोधनाशी संबंधित माहिती मिळविता येते. यात प्रत्यक्ष मार्गदर्शन नसतांनाही तसे आभासी वातावरण निर्माण केले जाते. जगातील कोणत्याही संस्थेद्वारे आपण संशोधन विषयक माहिती मिळवू शकतो. मात्र यासाठी संबंधित तशी व्यवस्था असणे आवश्यक आहे.

**ग्रंथालयाशी संबंधित संगणकातील/इंटरनेटमधील क्षमता/वैशिष्टये**

ग्रंथालय कार्याला पुर्णत: उपयोगी पडणाज्या संगणकातील/इंटरनेटमधील काही क्षमता किंवा वौशिष्टयांचा आपण येथे विचार करणार आहोत.

1. शोध सुविधा
2. संग्रह क्षमता
3. कामातील वेग व अचुकता
4. संख्याशास्त्रीय विश्लेषण क्षमता
5. विविध सॉफ्टवेअर्सचे उपयोजन
6. डिजीटल कार्यक्षमता व आकार

**1) शोध सुविधा :**

शैक्षणिक संशोधन विषयाशी संबंधीत विविध शौक्षणिक अहवाल, आकडेवारी, सिध्दांत संदर्भ ग्रंथय, अद्ययावत माहिती, सेन्सस इ. संगणकातील इंटरनेटच्या माध्यमाने शोधता येतात. विविध वेबसाईटस, ब्यॉग्स व लिंक्स याद्वारे इतर ठिकाणी झालेली संबंधीत संशोधने व माहिती यांचा शोध घेऊन त्या माहितीचा उत्तम प्रकारे उपयोग करता येतो.

**2) संग्रह क्षमता :**

संगणकात प्रचंड संग्रह क्षमता असते. शौक्षणिक संशोधनासाठी वेळोवळी मिळणारी माहिती आकडेवारी ही मोठया प्रमाणात असते. ही माहिती सतत वाढत जाणारी असते. त्यामुळे ही सर्व माहिती शेवटपर्यंत साठवून सुरक्षित ठेवणे महत्वाचे असते. कारण यावरच संशोधनाचे यश व निष्कर्ष अवलंबून असतात. संगणकामुळे हे काम सोपे व चांगले झाले आहे. तसेच ही माहिती सी.डी.फ्लॉपी, डी.व्ही.डी., पेनड्राईव्ह इ. साधनांत संगणकाच्या माध्यमाने साठवून सुरक्षित ठेवता येते.

3) **कामातील वेग व अचुकता :**

संगणकाचा कामातील वेग प्रचंड असतो. यामुळे शौक्षणिक संशोधनाचे कार्य कमी श्रमात व मर्यादित वेळेत पुर्ण होते. त्याचबरोबर संशोधन कार्यातील आकडेवारी व इतर कार्य अचुकपणे करीत असते. यामुळे संशोधनातील विश्वसनीयता वाढते.

4) **संख्याशास्त्रीय विश्लेषण क्षमता :**

संगणकाचे वौशिष्टये म्हणजे त्यात आपण गणितीय प्रक्रिया केल्यास त्याची उत्तरे व निष्कर्ष संगणक स्वता:च अचुकपणे देत असतो. यामुळे शौक्षणिक संशोधनातील संख्याशास्त्रीय आकडेवारी प्रक्रिया केल्यास आपोआप त्वरीत उत्तरे आपणास मिळतात. उदा. मध्यांक बहुलक, प्रमाण विश्लेषणासारखे किचकट व गुंतागुंतीचे काम कमी वेळेत व कमी कष्टात होते.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

5) **विविध सॉफ्टवेअर्सचे उपयोजन :**

संगणकामध्ये कोणतेही सॉप्टवेअर्स लोड करुन काम करता येत असते. यामुळे शैक्षणिक संशोधनासाठी आवश्यक असलेले अथवा तशा प्रकारे तयार करवुन घेतलेले विविध सॉफ्टवेअस संगणकात टाकून आपण वापरु शकतो.यामुळे संशोधन अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण रित्या पूर्ण करता येऊ शकते उदा. मानसशास्त्रीय कसोटया व चाचण्या यांचे सॉप्टवेअर, स्टॅटीस्टिकल सॉप्टवेअर, डाटाबेस म्ॅनेजमंेट सॉप्टवेअर वर्ड, एक्सल, पेंट पॉवरपॉईंट इ.

6) **डिजीटल कार्यक्षमता व आकार :**

संगणकामध्ये संशोधनाशी संबंधीत विविध तक्ते आलेख, चित्रे, फोटो, स्लाईडस इ. तयार करता येतात. तसेच इंटरनेटद्वारे शोधता येतात. त्याच बरोबर संशोधनात विविधता, आकर्षकताव संपुर्णता वाढविता येते. तसेच संशोधनासाठी विविध क्षेत्रांना, स्थळांना भेटी द्याव्या लागतात. अशा वेळी सोबत ल्ॅपटॉप, पामटॉप, मोबाईल कॉम्प्युटर इ. सोबत हाताळण्याजोगे संगणक वापरुन त्यांचा उपयोग करता येतो यामुळे काम सोपे व जलद होते.

**निष्कर्ष**

आजच्या डिजिटल युगात ग्रंथालये केवळ ग्रंथसंग्रहाची केंद्रे न राहता माहितीचे जागतिक प्रवेशद्वार बनली आहेत. इंटरनेटचा उपयोग केल्यामुळे ग्रंथालयीन सेवा जलद, परिणामकारक व वाचकाभिमुख झाली आहे. वेबसाईट्स व ऑनलाईन कॅटलॉगिंगच्या माध्यमातून वाचन व माहितीचा शोध अधिक सुलभ झाला आहे, तर ई-मेल, चॅटिंग आणि व्हिडीओ कॉन्फरन्सिंगमुळे वाचकांशी तात्काळ संवाद साधणे शक्य झाले आहे.

डिजिटल लायब्ररी, ब्लॉग्स आणि व्हर्चुअल लर्निंग यांसारख्या सुविधा ज्ञानप्रसारात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. यामुळे केवळ ग्रंथालयाच्या भौतिक सीमांमध्ये न अडकता, जगभरातील माहिती आणि साधनसंपत्ती वाचकांना उपलब्ध होते.

मात्र, या प्रगतीसोबतच माहितीचा अतिरेक, सायबर सुरक्षेचा धोका आणि तांत्रिक अडचणी यांसारखी आव्हानेही निर्माण झाली आहेत. त्यामुळे ग्रंथालयांनी डिजिटल साक्षरता वाढवणे, योग्य माहितीचे मुल्यमापन करणे व सुरक्षिततेच्या दृष्टीने दक्ष राहणे गरजेचे आहे.

सारांशतः, इंटरनेटचा वापर ग्रंथालयांसाठी अपरिहार्य झाला आहे. भविष्यात, इंटरनेटच्या नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रंथालयीन सेवा अधिक बुद्धिमान, प्रभावी व सर्वसमावेशक बनण्याची शक्यता आहे. त्यामुळे इंटरनेटचा विवेकी व रचनात्मक वापर ग्रंथालयांच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भ सूची**

1. Kapoor Srinath (2010). *Indian Journalism: A Historical Perspective*. New Delhi: Prentice Hall.
2. Patel Ramesh (2017). *Media, Communication, and Society*. New York: Routledge.
3. Sharma Prakash (2018). *The Role of Journalism in a Democratic Society*. Chicago: University of Chicago Press.
4. वर्मा रामनाथ,) 2002). *हिंदी पत्रकारिता का इतिहास*. नई दिल्लीराजकमल प्रकाशन :
5. यादव श्यामसुंदर,) 2015). *समाज और पत्रकारिता*. जयपुर.सूरज प्रकाशन :
6. त्रिपाठी ब्रजमोहन,) 2011). *हिंदी साहित्य और पत्रकारिता का सामाजिकीकरण*. इलाहाबाद.हिन्दी अकादमी :
7. पाटील महेश,) 2013). *पत्रकारितेचे सामाजिक दृष्टिकोन*. पुणे.यशवंतराव चव्हाण प्रकाशन :
8. जोशी रमेश,) 2016). *भारतीय पत्रकारिता आणि समाज*. मुंबई.लोकवाणी प्रकाशन :
9. देशमुख, विश्वनाथ) .2010). *मराठी पत्रकारितेचा इतिहास*. नागपूर.ज्ञानप्रकाशन :



Copyright © | JET Network, All Rights Reserved